**<u>निशाणी क्र.३४ वरील आदेश</u>**

वादी यांनी प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रतिवादी क्र.५ ओंकार बाबुराव शिंदे हे सज्ञान झालेने पूर्वी झालेला अ.पा.क. चा हुकूम रद्द करुन प्रतिवादी क्र.५ हा सज्ञान झालेची दुरुस्ती करणेची विनंती केली. तसेच वादी यांनी सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र.५ यांना दाव्याचे समन्स काढणेची विनंती केली.

०२. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जातील मजकूर खोटा असून त्यांना तो कबूल नाही असे म्हणून अर्ज खर्चासह नामंजूर होणेची विनंती केली.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन पृथकपणे कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. अभिलेखावर प्रतिवादी क्र.५ यांचे आधारकार्डची झेरॉक्सप्रत निशाणी क्र.२७ सोबत दाखल केली. त्याबाबत प्रतिवादी यांना वाद नाही. त्या आधारकार्डचे अवलोकन केले असता त्यावर ओंकार बाबूराव शिंदे यांची जन्मतारीख २९.०९.२००४ अशी असलेचे नमूद आहे. उपरोक्त जन्मतारखेनुसार आजरोजी प्रतिवादी क्र.५ हा आजरोजी १९ वर्षे ४ महिने वयाचा झाला आहे. त्यामुळे, प्रतिवादीची प्रस्तुत दाव्यामध्ये सज्ञान बाबतची दुरुस्ती तांत्रिक दोष राहू नये म्हणून करणे गरजेचे आहे. तशी दुरुस्ती केली तर दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही व प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

०४. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र.५ यांना दाव्याचे समन्स काढण्याची विनंती सुध्दा केलेली आहे. परंतु, याक्षणी वादीने मागणीप्रमाणे वाद पत्रात दुरुस्ती केलेनंतर व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करणे

अनिवार्य आहे. दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल केलेनंतर प्रतिवादी क्र.५ यांना दाव्याचे समन्स काढता येईल. परंतु, याक्षणी वादी यांनी प्रतिवादी क्र.५ ला दाव्याचे समन्स काढणेची केलेली विनंती ही अकाली असलेने ती मागणी याक्षणी मंजूर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही. त्यामुळे, अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे;

**<u>आदेश</u>**

१) निशाणी क्र.३४ वरील अर्ज अंशतः मंजूर करणेत आला आहे.

२) वादी यांनी त्यांचे मागणीप्रमाणे प्रतिवादी क्र.५ हे सज्ञान झालेची दुरुस्ती दाव्यामध्ये आदेश दिनांकापासून १४ दिवसांचे आत करावी.

३) दावा दुरुस्तीनंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४) अर्जदार करीत असलेली दुरुस्ती संगणक प्रणालीमध्ये करणेत यावी.

Sd/-

विटा
दि.१६.०२.२०२४.

(मो.शारीक ए.यू. रहेमान)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per dictation of P.O.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad, |
| Name of the Court | :- | M.S.A.U. Rahman,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita, Tal:-Khanapur, Dist.Sangli. |
| Date of decision | :- | 16/02/2024 |
| Order signed by P.O. on | :- | 16/02/2024 |
| Order uploaded on | :- | 16/02/2024. |